# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

## पाणी पुरवठा विभाग

वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com

जा.नं.: पा.पु. - १६० दि. १०/०५/२०२५

प्रति,
मा. प्रसिध्दी विभाग प्रमुख,
अहिल्यानगर महानगरपालिका.

विषय- मुळानगर येथील पंप नादुरूस्त झाल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास **एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा होणार असले बाबत...**

महोदय,

विषयांकीत बाबत कळविण्यांत येते की, महानगरपालिकेचे मुळानगर पंपीग स्टेशन येथे ७२५ एच.पी.चे दोन पंप व ४०० एच.पी. चे २ पंप नियमित चालवून शहरास पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत उन्हाळयाचे दिवस असल्याने धरणाची पातळी खालवली असल्याने ४०० एच.पी. चा स्टॅण्ड बाय पंप चालवावा लागत आहे. हा जास्तीचा ४०० एच.पी. स्टॅण्ड बाय पंप दि. ११/०४/२०२५ पासून चालू असतांना आज दि. ०९/०५/२०२५ रोजी अचानक पणे नादुरूस्त झालेला आहे. तसेच ७२५ एच.पी. चा स्टॅण्ड बाय पंपाची देखील दुरूस्ती चालू आहे. त्यामुळे सद्यस्थितीत अतिरिक्त पंप चालविण्यास उपलब्ध नसल्याने मुळानगर येथून होणारा पाण्याचा उपसा कमी झालेला आहे.

नादुरूस्त झालेला ४०० एच.पी. पंपाचे दुरूस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले. सदर दुरूस्तीस २४ तास इतका अवधी लागणार असल्याने शहरातील पाणी पुरवठा करणेकामी उपलब्ध पाणी कमी पडणार आहे. पर्यायाने शहरातील प्रत्येक भागाचे पाणी एक दिवसाने उशिरा सोडण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतलेला आहे.

त्यामुळे शनिवार दि.१०/०५/२०२५ रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकूंदनगर तसेच सारस नगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास पाणी पुरवठा होउ शकणार नाही. सदरचा पाणी पुरवठा हा रविवार दि.११/०५/२०२५ रोजी करणेत येईल.

तसेच रविवार दि.११/०५/२०२५ रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने म न पा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इत्यादी भागात महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही, या भागातील पाणी पुरवठा हा रविवार ऐवजी सोमवार दि.१२/०५/२०२५ रोजी करण्यात येईल.

P/C

Scanned with OKEN Scanner

सोमवार दि.१२/०३/२०२५ रोजी पाणी पुरवठा होवू घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॅालनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर इत्यादी भागात पाणी पुरवठा होणार नसून तो मंगळवार दि.१३/०५/२०२५ रोजी करण्यात येईल.

तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. अशा प्रकारची प्रेस नोट वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.

जल अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner